**Indian Streams Research Journal**
**Vol -2 , ISSUE –X , Nov- 2012**
**ISSN No - 2230 - 7850**
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# कर्नल वॉलेस यांचे शिरूर परिसरातील सामाजिक कार्य

**प्रा. हरिदास शंकर जाधव**
इतिहास विभाग, चां.ता. बोरा महाविद्यालय, शिरुर.

पुणे जिल्हयातील तालुक्याचे ठिकाण असलेल्या व घोडनदीच्या काठावर वसलेल्या शिरुर (घोडनदी) या शहराला मध्ययुगीन कालखंडापासून लष्करी दृष्टया महत्व प्राप्त झालेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठ्यांच्या अस्मितेचे रक्षण करणारी सत्ता स्थापन करण्याचा जो यशस्वी प्रयत्न केला त्यात शिरुर परीसर मागे नव्हता. किंबहुना स्वराज्यावर आलेल्या अनेक संकटाच्या वेळी या परीसराने मोठे योगदान दिले आहे. १६५९ च्या अफजलखान प्रसंगापासून ते १७६१ च्या पानिपत युध्दापर्यंत या परीसरातील नेताजी पालकर, ढमढेरे, पवार, सोमवंशी, मोकाशी, अशा अनेक सरदारांनी मराठी राज्याची लष्करी सेवा बजावली. ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या काळातही सैनिकी दृष्टया शिरुर परीसराला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले. मुधोजी घोरपडयांनी इंग्रजांना मदत केल्यामुळे इ.स. १८०२ साली इंग्रजांनी त्यांना २००० घोडेस्वारांचा रिसाला शिरुर येथे ठेवण्याची सनद दिली. घोरपडयांच्या नेतृत्वाखालील या रिसाल्यामुळे शिरुर परीसराचे लष्करी दृष्टया महत्व अबाधित राहिले. इ.सन १८१८ च्या कोरेगांव येथील लढाईत ब्रिटीशांनी शिरुर येथील लष्कराचा मोठया कुशलतेने वापर करुन घेतला. कॅप्टन स्टॉटन यांनी कोरेगावच्या लढाईसाठी कर्नल बर यांच्या आदेशानुसार पहिल्या बॉम्बे नेटिव्ह इंन्फट्रीपैकी दुसरी बटालियन, दोन तोफा आणि २५० घोडेस्वार इतका फौजफाटा ३१ डिसेंबर १८१७ रोजी ९ वाजता शिरुरहून नेल्याची नोंद मिळते[1]. या लष्करी तळाच्या निमित्ताने

शिरूर येथे अनेक ब्रिटीश अधिका-यांचे वास्तव्य होते. यामध्ये कर्नल वॉलेस हे एक महत्वाचे व स्थानिकांमध्ये लोकप्रिय झालेले अधिकारी होते असे दिसून येते. प्रस्तुत शोधनिबंधातून कर्नल वॉलेसच्या ऐतिहासिक सामाजिक कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**कर्नल वॉलेस :**

कर्नल विल्यम वॉलेस हा विल्यम वॉलेस व जिन कॅम्पबेल यांच्या पाच अपत्यांपैकी दुसरे अपत्य असून शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीची लष्करी सेवा स्वीकारली.

इंग्लंडमधील अनेक लष्करी व नागरी सेवेतील अधिका-यांप्रमाणे भारताचे आकर्षण असलेला वॉलेस भारतात आले, आणि १८ व्या ब्रिटीश रेजिमेंटमध्ये कर्नल म्हणून सेवेस प्रारंभ केला[2]. सन १८०३ मध्ये दुस-या इंग्रज-मराठा युध्दाच्या काळात ब्रिटीशांनी गाविलगडला वेढा घातला तेव्हा त्यांना आवश्यक असणा-या बंदुका व दारुगोळा अतिशय अवघड आणि उंच ठिकाणी पोहचविण्याचा आदेश प्राप्त झाला होता. परंतु अशा अवघड ठिकाणी हे लष्करी साहित्या पोहचविण्यास सहका-यांनी विरोध करुन या आदेशाचा निषेध केला परंतु याचवेळी कर्नल वॉलेस यांनी "Impossible? It cannot be impossible. Here it is in orders."[3] अशी निर्धारपूर्वक भूमिका घेत ती कामगिरी यशस्वीपणे पार पाडली. यानंतर ते शिरुर येथील बॉम्बे नेटिव्ह इंन्फट्रीमध्ये कर्नल म्हणून दाखल झाले. शिरुर येथे आल्यानंतर लष्करी अधिकारी म्हणून ब्रिटीश साम्राज्य वाढविण्याबरोबरच येथील लोकांच्या संरक्षणाची त्यांनी उत्तम व्यवस्था केलेली दिसून येते. पेढांरी, ठग, चोरव लुटारु यांना आळा घालण्याची महत्वाची कामगिरी कर्नल वॉलेस यांनी पार पाडलेली दिसून येते. लष्करी सेवेबरोबरच येथील लोकांच्या सामाजिक व सांस्कृतिक उन्नतीसाठी त्यांचा मोठा हातभार लागल्याचे दिसते. विशेषतः समाजातील कामाठी, कुणबी, माळी, महार, मांग या पारंपारिक समाजव्यवस्थेतील पिचलेल्या लोकांना आधार देऊन त्यांच्या अडीअडचणी सोडविण्याचे कार्य केले. त्याचबरोबर तत्कालीन वारंवार येणा-या साथीच्या रोगांचे निर्मूलन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले, तसेच मागासलेल्या जाती-जमातीत असलेल्या अंधश्रध्दातून लोकांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे तत्कालीन कागदपत्रांत त्यांचा उल्लेख "शिरुरचा पालक" (Guardian of Sirur) असा करण्यात आला आहे[4]. अशा या लोकप्रिय लष्करी अधिका-याचा मृत्यू ११ मे, १८०९ रोजी शिरुर येथे झाला. आजही शिरुर शहरालगतच्या रामलिंग रोडलगतच्या मोती नाल्याजवळ कर्नल वॉलेसचे स्मारक पहावयास मिळते.



**कर्नल वॉलेसचे शिरुर येथील स्मारक**

संदर्भ- Paul Hooper- FIBIS: Families in British India Society, Serror Cementary- A Report of Visit on 11 September 2015.

### वॉलेसचा स्थानिक जनमानसावरील प्रभावः

१८०९ साली आपली जीवन यात्रा संपविणा-या या अधिका-याचा मृत्यूनंतरच्या काळातही स्थानिक जनमानसावर मोठा प्रभाव राहिल्याचे दिसून येते. स्थानिकांमध्ये एक सत्पुरुष (The Holy Man) म्हणून वॉलेसला स्थान प्राप्त झाले."[5] त्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर लोक त्यांच्या स्मारकाची पवित्र स्थान म्हणून पुजा करु लागले. परीसरात एखादी नैसर्गिक अथवा मानवनिर्मित आपत्ती निर्माण झाल्यास हा पवित्र आत्मा त्या आपत्तीचे निवारण करतो अशी लोकांची श्रध्दा असल्याने परीसरातील सर्व जाती-जमातीतील लोक कर्नल वॉलेसच्या स्मारकास पवित्र मानू लागले, कर्नल वॉलेसच्या वास्तव्यामुळे साथीचे रोग व इतर संकटांवर मात करता येते अशी लोकांची समजूत होती. विशेष बाब म्हणजे परीसरातील शेतकरी सुगीच्या दिवसात नवीन आलेल्या धान्याचा व इतर शेती मालाचा पहिला नैवैद्य या स्मारकास दाखवित असल्याची माहिती मिळते. आठवडयातील दर गुरुवार व रविवारी या स्मारकास नारळ, फळे व गोड नैवैद्य दाखविला जात होता[6]. याशिवाय काही वेळा स्थानिक कामाठी व इतर मांसाहार करणारे लोक कर्नल वॉलेसच्या स्मारकासमोर बक-याचा बळी देऊन कंदुरी करीत असल्याची अनेक उदाहरणे आहेत. नंतरच्या काळात अमेरिकन मिशनचे रेव्हरंड फ्रेंच यांनी १८४० ते १८५० या काळात अशा बळी देऊन पुजा करण्याच्या प्रथेला विरोध करण्याचा प्रयत्न केला होता, परंतु १८८३ साली बक-याची कंदुरी झाल्याची माहिती मिळते.[7]

अशा रीतीने एका ब्रिटीश लष्करी अधिका-याने आपली लष्करी सेवा बजावत असताना लोकांच्या संरक्षणाबरोबरच लोककल्याणाचेही कार्य केले होते. कर्नल वॉलेसच्या जीवन कार्यावरुन व शिरुर परीसरातील जनमानसातील लोकप्रियतेवरुन ठळकपणे हे अधोरेखित होते.

### संदर्भ व तळटीपाः

1. परांजपे शि.म, मराठ्यांच्या लढयांचा इतिहास-१७९२ते १८१८. चित्रशाळा प्रेस, पुणे, आवृत्ती दूसरी, १९३४,
2. The Peerage: A Genealogical Survey of the Peerage of Britain as well as the Royal Families of Europe, p.5
3. Poona the Peshwas' City and its Neighborhood, Guide to places with interest of History and Maps, Col. H. A. Newell F. R. G. S. Indian Army., P.73
4. Gazetteer of Bombay Presidency, Poona Vol. 28, Government Central Press, 1886, P-447
5. James Douglas, Bombay and Western India: A Series of Stray Papers Vol. 1, P. 369
6. Digital South Asia Library, Imperial Gazetteer of India, Vol.23 p. 48
7. Gazetteer of Bombay Presidency, Government Central Press, 1886, P-448 Poona Vol. 28